# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 10/09/2023 (रविवार) दुपार**


---

### विनयभंग

**पो.स्टे. सावनेर** :– दिनांक २५/०८/२०२३ चे ११.०० वा. ते दिनांक ०८/०९/२०२३ चे दरम्यान फिर्यादी व आरोपी नामे– १) जगन शेट्टी पवार रा. वडार मोहल्ला पहलेपार सावनेर २) करण लक्ष्मन लष्कर रा. वडार मोहल्ला पहलेपार सावनेर हे एकाच मोहल्ल्यात राहत असुन फिर्यादी ही अंघोळ करीत असता यातील आरोपी यांनी तिचा अंघोळीचा विडीओ बनविला व तु आमचे सोबत एक रात्र झोप नंतर तुझा विडीओ डिलीट करतो जर तु आमचे सोबत झोपली नाही तर तुझा विडीओ वाट्सअप वर पाठवुन तुझी बदनामी करील असे म्हणुन तिचा वारंवार पाठलाग केला सदरची बाब यातील फिर्यादी हीने तिच्या मित्राला सांगितली असता फीर्यादीचे मित्राने सुध्दा आरोपी यास विडीओ डिलीट करण्यास सांगितले असता यातील आरोपी यांनी त्यास जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द ३५४ (अ) (क) (ड), ३४, ५०६ भादवी सहकलम १२, १७ पोक्सो ॲक्ट गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो.नी. मानकर सा. पो.स्टे. सावनेर मो. नं. ७०२०७०५४१७ हे करीत आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत मौजा तितुर येथे दिनांक ०८/०९/२०२३ चे रात्री ०९/०८/२०२३ सकाळी दरम्यान शेतातील लॉक तोडुन ६ क्विंटल चना किंमती २४०००/– रू , ४ लोखंडी पाईप किंमती ४०००/– रू , १ लोखंडी कल्टीवेटर किंमती ५०००/– रू. ३ लोखंडी किंमती १०००/– रू १ लोखंडी सब्बल किंमती १०००/–रू जर्मन गंज किंमती १०००/– रू २ लोखंडी पलंग किंमती २०००/– रू. १ लोखंडी वखर किंमती २०००/– रू. १ लोखंडी २०००/– रू १ लोखंडी डवरा किंमती १०००/– रू. १२ स्प्रींकलर किंमती २००० असा एकुण ४५०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणतेतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अजय डोमाजी मोहोड, वय ५९ वर्ष, रा. उमरेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा सुनिता या करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर